पुणे महानगरपालिका
महिला व बाल कल्याण समिती
कार्यपत्रिका क्र.२

महिला व बाल कल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार,दिनांक २९/०५/२०१९ रोजी दुपारी ३=३० (तीन वाजून तीस मिनिटे) वाजता समिती सभागृह,दुसरा मजला पुणे महानगरपालिकेची नविन विस्तारीत इमारत येथे भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

विषय.क्र ४

मा.महेश वाबळे यांचे दि.१५/५/२०१९ चे पत्र.

प्र.क्र.३५ ड मध्ये पद्मावती मंदिरा शेजारील मुतारी नागरिकांस वापरास योग्य नसल्याने व जीर्ण झाली असल्याने सदर मुतारीच्या बाजूला पुणे मनपा मार्फत नव्याने मुतारी विकसित करण्यात आलेली आहे.

तरी प्र.क्र.३५ ड मध्ये पद्मावती मंदिरा शेजारील विनावापर व जीर्ण अवस्थेतील मुतारी पाडण्यात यावी.

विषय.क्र ५

मा.प्रा.सौ.ज्योत्स्ना गजानन एकबोटे–अध्यक्षा,महिला व बाल कल्याण समिती यांचे दि.१७/५/२०१९ चे पत्र.

पुणे महानगरपालिकेत विविध कामांसाठी येणारे शहरातील नागरिक तसेच सामजिक व राजकीय क्षेत्रातील कार्यकर्ते तसेच महापालिकेचे कर्मचारी व अधिकारी दैनंदिन कामांकरिता येत असतात. आजच्या धकाधकीच्या काळात महापालिकेत येणाऱ्या नागरिक,कर्मचारी व अधिकारी यांची जीवनशैली बदलत चालली आहे. त्यामुळे या सर्व गोष्टीचा ताण त्यांच्या आरोग्यावर होत असल्याचे निदर्शनास येत आहे. महापालिकेच्या इमारतीमध्येच अनेकदा नागरिक किंवा आपला कर्मचारी वर्ग यांना आपतकालीन स्थितीमध्ये तात्काळ उपचार उपलब्ध झाल्यास होणारी गंभीर दुर्घटना किंवा संभाव्य धोका टाळण्यासाठी सुसज्ज प्रथमोपचार कक्ष आवश्यक त्या साधनसामुग्री व प्रशिक्षित वैद्यकिय अधिकारी/कर्मचारी यांच्यासहीत पुणे महानगरपालिकाच्या नवीन व जुन्या इमारतीच्या मधील आवश्यक त्या ठिकाणी तयार करण्यात यावा. जेणेकरून प्राथमिक उपचार तात्काळ उपलब्ध होतील व होणारी जिवितहानी टाळता येण्यास मदत होईल.

विषय.क्र ६

मा.प्रा.सौ.ज्योत्स्ना गजानन एकबोटे–अध्यक्षा,महिला व बाल कल्याण समिती यांचे दि.१७/५/२०१९ चे पत्र.

पुणे महानगरपालिकेच्या माध्यमातुन प्रत्येक क्षेत्रिय कार्यालयाच्या स्तरावर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या किंवा तिसऱ्या शनिवारी आरोग्य शिबीर आयोजित करण्यात यावे व शिबिरांसाठी खातेनिहाय आवश्यक तेवढा प्रशिक्षित डॉक्टर्स व कर्मचारी वर्ग असावा. या शिबिरासाठी शिबिरादरम्यान होणारा औषधोपचारासहीत खर्च आरोग्य विभागाच्या खात्याअंतर्गत तरतुदीतून करण्यात यावा.

<u>विषय.क्र ७</u>

घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील वरीष्ठ आरोग्य निरीक्षक या पदावर बढती दिलेल्या सेवकांना आरोग्य निरीक्षक या पदावर पदावनत केल्याबाबतचे मा.महा. आयुक्त यांचे जा.क्र.मआ/(सा.प्र.)१५८९,दि.५/३/२०१९ चे पत्र.

<u>विषय क्र. ८</u>

अंशदायी वैद्यकीय सहाय्य योजनेअंतर्गत सभादत्व घेतलेल्या पुणे महानगरपालिकेचे माजी सभासद व त्यांचे कुटुंब सदस्य यांचे साठी आरोग्य सुविधेसाठी मा.संजय भोसले गटनेते,शिवसेना व मा.विशाल धनवडे यांचे दि०४/९/२०१८ च्या पत्रावर पत्रावर झालेला महिला व बाल कल्याण समिती सभा ठराव क्र.७३,दिनांक २६/९/२०१८ ला अनुसरून मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र.मआ/आरोग्य/१६०५, दिनांक ०८/०३/२०१९ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी .

<u>विषय क्र. ९</u>

पुणे महानगरपालिका माध्यमिक शाळांमधून शिकणा–या आर्थिक दुष्ट्या दुर्बल परंतु गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना इयत्ता ११ वी आणि १२ वी शास्त्र शाखेचे (व्दिलक्षी अभ्यासक्रम) दर्जेदार व मोफत शिक्षण देणेबाबत मा.महा. आयुक्त यांचे जावक क्रं.मआ/ इओ/ १६६९, दिनांक .२०/३/२०१९ चे पत्र.

(टिप:विषय क्र.७ ते ९ चा विचार आचारसंहिते नंतर करावा असे दि.१५/५/२०१९ च्या सभेत ठरले होते.)

नगरसचिव
पुणे महानगरपालिका